# दुसरीवेळ मुदतवाढ नोटिस

## जाहिरात

## स्वच्छ भारत मिशन ग्रामीण, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हा परिषद नागपूर

## स्वारस्य अभिव्यक्ति (EOI)

## Expression of Interest Notice

स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ अंतर्गत व्यावसायिक संस्था/कंपनी म्हणून कार्य करु इच्छिणा-या संस्थांची सुची (empanelment) तयार करण्यासाठी स्वारस्य अभिव्यक्ति (EOI) सादर करणे करीता आवेदन करण्याबाबत.

स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ अंतर्गत नागपूर जिल्हयात निवडक गावांमध्ये घनकचरा व सांडपाणी प्रकल्प कामांकरीता सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रके / प्रस्ताव / आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला/सहाय्य प्रदान करणेसाठी पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील काम करणा-या व्यावसायिक संस्था यांचेकडून सहयोग देण्याची इच्छा असेल अश्यांकडून अर्ज या कार्यालयास मागविण्यात येत आहे.
सदर विषयाचे अनुषंगाने दिनांक 21 जुन 2024 रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर जाहिरातीस याव्दारे खालील नमुद नुसार दुसरी वेळ मुदतवाढ देण्यात येत असुन जाहिरातीचे अनुषंगाने कामाचे प्रारुप, अटी व शर्ती www.nagpurzp.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच कार्यालयाबाहेर प्रकाशित करण्यात आलेली आहे.

**अर्ज स्विकारण्याची तारीख: 30 जुलै 2024 ते 05 ऑगष्ट 2024. वेळ: सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत**

**प्रकल्प संचालक (पाणी व स्वच्छता)**
**जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष**
**जि.प.नागपूर**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नागपूर**

**कार्यालयाचा पत्ता**
**जिल्हा पाणी व स्वच्छता कक्ष, जुनी इमारत, दुसरा माळा, जिल्हा परिषद परिसर, सिव्हिल लाईस, नागपूर**
**दुरध्वनी क्रमांक: ०७१२-२५५०३९८ -ई-मेल- sbmg2zpnagpur@gmail.com**

# जिल्हा परिषद, नागपूर
# जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन

---------------------

## घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प तयार करणे करिता सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रके व प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला/सहाय्य प्रदान करणे
## या करीता स्वारस्य अभिव्यक्ति (EOI)
## सादर करण्या बाबत

**व्यावसायिक संस्थेचा नाव व पत्ता:**-------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

**संपर्क व्यक्तीचे नाव व संर्पक क्रमांक-**

**संस्थेचा ईमेल**

| सुधारी प्रारुप- अ | | | |
|---|---|---|---|
| **व्यावसायिक संस्था निवडी करीता गुणांकन घटक** | | | |
| **अ.क्र.** | **विवरण** | **विश्लेषण** | **गुण** |
| 1 | संस्थेचा विषयासंबधी अनुभव | संस्थेस पाणी पुरवठा व स्वच्छते संदर्भात कामाचा किमान 5 व त्यापेक्ष्या अधिक वर्षाचा अनुभव. | 40 |
| 2 | शासकीय कामाचा अनुभव | संस्थेस पाणी पुरवठा व स्वच्छता किंवा इतर विभागात शासना सोबत कामाचा किमान 5 त्यापेक्ष्या अधिक वर्षाचा अनुभव. | 20 |
| 3 | तज्ञ व प्रशिक्षीत मनुष्यबळ | संस्थे कडे विषयाचे अनुषंगाने किमान 2 अनुभवी स्थापत्य/ पर्यावरणीय अभियंता व 2 अनुभवी सामाजकार्य तज्ञ मनुष्यबळ असयाला हवे | 10 |
| 4 | लेखा परिक्षण | संस्थेने मागील 3 वर्षाचे लेखा परिक्षण व अहवाल मान्यकृत सनदी लेखापाल व्दारा केलेला. | 10 |
| 5 | आर्थिक उलाढाल | संस्थेची वार्षिक आर्थिक उलाढाल किमान 50 लक्ष त्यापेक्ष्या अधिक. | 20 |
| **एकुण गुण** | | | 100 |

## सुधारीत प्रारुप- ब

### प्रारुप - अ नुसार स्वयंसेवी व व्यावसायिक संस्था निवडी करीता गुणांकन घटकाचे वर्गीकरण

| अ.क्र. | विवरण | अनुभव वर्षात | गुण | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | संस्थेचा घनकचरा-सांडपाणी, पाल्सटीक वेस्ट व्यवस्थापन, फीकेल सलेज व्यवस्थापन व गोबरधन विषयक कामाचा अनुभव | किमाण 5 वर्षे | 20 | सदर घटकातंर्गत निवडी करिता किमान 20 गुण आवश्यक |
| | | 5 वर्षा पेक्ष्या अधिक | 40 | |
| 2 | शासकीय कामाचा अनुभव | किमाण 5 वर्षे | 10 | सदर घटकातंर्गत निवडी करिता किमान 10 गुण आवश्यक |
| | | 5 वर्षा पेक्ष्या अधिक | 20 | |
| 3 | मनुष्यबळ | 2 स्थापत्य/ पर्यावरणीय अभियंता व 2 समाजकार्य स्नातोक्तर | 10 | 10 गुण अनिवार्य |
| 4 | लेखा परिक्षण | मागील 3 वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल | 10 | 10 गुण अनिवार्य |
| 5 | आर्थिक उलाढाल | मागील 3 वर्षात कुठल्याही वर्षी किमान 50 लक्ष वार्षिक उलाढाल असल्यास | 10 | सदर घटकातंर्गत निवडी करीता किमान 10 गुण आवश्यक |
| | | मागील 3 वर्षात कुठल्याही वर्षी किमान 50 लाखा पेक्षा अधिक वार्षिक उलाढाल असल्यास | 20 | |
| **उपरोक्त प्रमाणे घटक निहाय सर्व घटक मिळुन किमान आवश्यक 60 गुण प्राप्त होणाऱ्या संस्थाची अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल.** | | | 100 | |

| प्रारुप- क | | | |
|---|---|---|---|
| **व्यावसायिक संस्था /कंपनी अनुभव** | | | |
| **अ.क्र.** | **विवरण** | **अनुभव वर्षात** | **संस्था पुर्ण करीत असलेली अर्हता- नमुद करा दस्ताऐवज जोडा पान क्रं. सह नमूद करा** |
| 1 | संस्थेचा विषयासंबधी अनुभव | किमान 5 वर्षे | |
| | | 5 वर्षा पेक्षा अधिक | |
| 2 | शासकीय कामाचा अनुभव | किमान 5 वर्षे | |
| | | 5 वर्षा पेक्षा अधिक | |
| 3 | मनुष्यबळ | 2 स्थापत्य/ पर्यावरणीय अभियंता व 2 समाजकार्य तज्ञ | |
| 4 | लेखा परिक्षण | मागील 3 वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल | |
| 5 | आर्थिक उलाढाल | मागील 3 वर्षात कुठल्याही वर्षी किमान 75 लक्ष वार्षिक उलाढाल असल्यास | |
| | | मागील 3 वर्षात कुठल्याही वर्षी 1 कोटी पेक्षा अधिक वार्षिक उलाढाल असल्यास | |

**प्रपत्र "ब" मध्ये नमुद केल्याप्रमाणे  घटक निहाय सर्व घटक मिळुन किमान आवश्यक 60 गुण प्राप्त होणाऱ्या संस्थाची अंतिम निवड यादि प्रसिध्द करण्यात येईल.याबाबत संस्थेचा कोणताही तक्रार/विनंती ग्राहय धरण्यात येणार नाही.**

**प्रपत्र- ड**

## स्वारस्य अभिव्यक्ती सादर करणाऱ्या व्यावसायिक संस्था /कंपनी नी अर्जा सोबत सादर करावयाची कागदपत्रे.

- कंपनी अधिनियम 1956 व सुधारीत प्रमाणे, कलम 8, भागीदारी कायदा किंवा सहकार कायदा अंतर्गत अन्य त्तसम प्राधिकरण नोंदणी प्रमाणपत्र.
- मागील 3 वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल.
- संस्था /कंपनी शेडयुल संस्थाचे सदस्य संबंधातील दस्ताऐवज.
- PAN /TAN नंबर व प्रमाणपत्र.
- Income Tax उत्पन्न कर भरल्याबाबत प्रमाणपत्र.
- उपलब्ध मनुष्यबळ यादी शिक्षण व अनुभवासह. गोषवारा विवरणपप्रत्र क मध्ये नमुद करावे.
- कामाचा अनुभवाचे आदेश व अहवाल. – वर्ष निहाय गोषवारा विवरण पप्रत्र क मध्ये नमुद करावे.
- आर्थिक उलाढाल संदर्भात बँक विवरण व सनदी लेखापाला यांचे प्रमाणपत्र. मागील तीन वर्षाचे Audiat Annual A/c .Bank Solvency Certificate.
- संस्था संस्था /कंपनी काळा यादीत समाविष्ट,न्यालयील कार्यवाही, पोलीस कार्यवाही नसल्याबाबत स्वयंघोषित प्रमाणपत्र.
- व्यावसायिक संस्था करिता व्यवसाय व कर नोंदणी प्रमाणपत्र.भागीदारी व्यासायिक संस्था प्रमाणपत्र.
- संस्था /कंपनीने अर्जासोबत जोडलेली व नमुद केलेली सर्व माहिती हि सत्य असल्याचे स्वंयघोषित प्रमाणपत्र.
- उपरोक्त सर्व प्रमाणपत्रावर वरली क्रमाने पान क्रंमाक नमुद करुन समोर तशी सुची लावावी.
- वार्षिक आर्थिक उलाढाल प्रमाणपत्र.
- मागील 3 वर्षाचे ITR प्रमाणपत्र.
- GST प्रमाणपत्र व GST भरणा केल्याची अद्यावत पावती.
- निविदा शुल्क रु.18001/- भरणा केल्याची पावती.
- बयाना रक्कम ही इम्पॅनलमेंट सुची प्रकाशित केल्याचे दिनांका पासुन 7 दिवसाचे आत विभागाचे खात्यावर भरणा करण्यास तयार असल्याचे हमीपत्र बंधनकारक राहील.

**प्रपत्र- इ**

## स्वारस्य अभिव्यक्ती सादर करणाऱ्या व्यावसायिक संस्था /कंपनी नी अर्जा सोबत सादर करावयाचे हमी पत्र.

मी/आम्ही-------------------------------आमची संस्था------------------------------- हमी देतो की जर मी/आम्ही/आमची संस्था सदर जाहिरातीचे सर्व अटी व शर्तीचे पुर्तता केल्यानुसार करण्यात येण्याऱ्या ईंमपॅनलमेंट मध्ये निवड झाली तर विभागाव्दारे कामाचे अनुषंगाने कळविण्यात येणारी बयाना रक्क्म (EMD) निविदेतील अटी नुसार 7 दिवसाचे आत भरण्यास तयार आहे.

मी/आम्ही-------------------------------आमची संस्था-------------------------------सदर बयाना रक्क्म (EMD) 7 दिवसाचे आत न भरल्यास काम मिळण्याकरीता आमचा कुठलाही दावा राहणार नाही व आम्ही तो करणार नाही.

संस्था अधिकृत प्रतिनिधी

सही/शिक्का

## प्रपत्र-फ.

## व्यावसायिक संस्था /कंपनी यांचे एम्पॅनेलमेंट करीता अटी व शर्ती.

1. व्यावसायिक संस्था/कंपनी नोंदणीचे प्रमाणपत्र अनिवार्य असुन सादर करावे लागतील.
2. व्यावसायिक संस्था/कंपनी यांचे मागील ३ वर्षाचे लेखापरिक्षण Audit Report अहवाल सादर करावे लागतील.
3. व्यावसायिक संस्था/कंपनी पॅनकार्ड आवश्यक आहे.
4. व्यावसायिक संस्था/कंपनी यांनी मागील ३ वर्षातील Income Tax भरल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
5. व्यावसायिक संस्था/कंपनी कडे अनुभवी सोशल व तांत्रिक मनुष्यबळ असने गरजेचे आहे.तपशील जोडावा.
6. संस्थाचे एम्पॅनलमेंट, व कार्यादेश हे स्वतंत्र विषय राहतील. एम्पॅनलमेंट सुचीस कार्यदेश समजण्यात येणार नाही.
7. एकूण 16 गावांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करावयाचे असुन कामा करीता कालमर्यादा बघता या 50% प्रमाणे एकुण 08 संस्थाचे ईम्पॅनलमेंट तयार करण्यात येणार आहे. या करीता मेरीट गुणांकाणा नुसार उतरत्या क्रंमाने प्रथम 08संस्थांची ईम्पॅनलमेंट सुची तयार करण्यात येईल.
8. एकुण 08 संस्था ईम्पॅनलमेंट करीता पात्र न झाल्यास 50% प्रमाणे प्रमाणे समप्रमणात कामाचेवाटप करण्यात येईल.
9. विभागाचे दिनांक 2022 चे शा.नि.मधील तरतुदी नुसार या गावांच्या प्राकलीत किमंतीच्या 5 % रक्कम संस्थाना देय आहे.
10. निवड सुची प्रकाशित झाल्याचे दिंनाकापासुन 7 दिवसाचे आत बयाना रक्क्म (EMD) विभागाचे खात्यावर भरणे बंधनकारक राहील. तसे हमी पत्र परिषिष्ट इ नुसार जोडणे बंधनकारक राहील.
11. EOI प्रकीयेत सहभाग घेणाऱ्या संस्थाना निविदा शुल्क Online Banking पध्दतीने खालील खात्यावर भरणा करणे व प्रस्तावा सोबत पावती जोडणे बंधनकारक आहे.
    State Bank of India ZP Cess Fund Account -AC No 33521260532 IFSC SBIN0000432
12. उद्योग उर्जा विभागाचे दिनांक.1.12.2015 चे शा.नि. परिशिष्ट 8 प्रमाणे निविदा शुल्क व बयान रक्क्म करीता पात्र संस्थाना सदर सुट लागु राहील.

12.एम्पॅनलमेंट करण्यात आलेल्या संस्था/कंपनीचा कार्यकाळ हा प्रकल्प कालावधी पर्यंत राहील.

13.व्यावसायिक संस्था/कंपनी घनकचरा व सांडपाणी कार्यक्रमा करीता सर्वेक्षण, आराखडा तयार करणे (DPR) व पर्यवेक्षण करणे तांत्रिक सल्ला याबाबत शासकीय विभागात कामाचा अनुभव असावा.

14.शासन निर्णया नुसार निश्चित करण्यात आलेल्या निकषा प्रमाणे अंदाज पत्रक/ आराखडे तयार करणे अनिवार्य राहील. तांत्रिक पडताळणी मध्ये या निकषा प्रमाणे नसलेले आराखडे स्वीकार्य राहणार नाही व या करीता कुठलेही शुल्क देय राहणार नाही.

१३.सर्शत स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) स्वीकारण्यात येणार नाही.

१५.संस्था/कंपनी ची निवड ही किमान प्राप्त गुणांच्या आधारे अंतिम करण्यात येईल. प्रपत्र ब मधील विवरना नुसार किमान ६० गुण प्राप्त असणाऱ्या संस्थाच पडताळणी व निवडी करीता पात्र राहतील.

१६.स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मध्ये पात्र असणाऱ्या संस्थाची यादी हि कार्यादेश म्हणुन समजण्यात येणार नाही.बयाना रक्कम (EMD) भरल्यानंतरच कार्यादेश निर्गमित करण्यात येतील.

१७.व्यावसायिक संस्था/कंपनी जाहीरात प्रकाशित झाल्याचे दिनांक पासुन ७ दिवसांचे आत पंजीकृत पोस्टाने अथवा प्रत्यक्ष कार्यालयात प्रस्ताव सादर करु शकतील. उशीरा आलेले प्रस्ताव स्वीकारण्यात येणार नाही.

१८ व्यावसायिक संस्था/कंपनी संस्थांचे प्रस्ताव मुदत कालावधी मध्ये कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेतच स्वीकृत करण्यात येईल.

१९. स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मध्ये पात्र ठरविण्यात आलेल्या संस्था/कंपनीस सक्षम प्राधिकरणा मार्फत कार्यादेश प्राप्त झाल्यानंतर त्यांना नियोजित कामाकरिता गावाच्या अंदाजपत्रकीय आरखडयाच्या ५ % किंवा रुपये १.०० लक्ष यापैकी जी कमी असेल ती रक्कम शासन निर्देशा नुसार टप्पात विभागुन अदा करण्यात येईल. मात्र या करीता आराखडयात तशी तरतुद करणे अनिवार्य ही जवाबदारी आरखडा तयार करणाऱ्या संस्थांची राहील. सदर दर /शुल्क हे सर्व समावेषक राहतील.

२०.निवड व आदेश प्राप्त संस्थाना देय असलेल्या शुल्कातुन सर्व प्रकारच्या आवश्यक वैधानिक कपाती करण्यात येतील.

२१.निवड व आदेश प्राप्त संस्थानी त्यांचे कामात दिरंगाई केल्यास आदेशात नमुद वेळेत काम पूर्ण न केल्यास करारात नमुद करण्यात आल्याप्रमाणे Penanlty आकरण्यात येईल.

२२.संस्थेने सदर कामाकरीता नियुक्त केलेल्या कर्मचारी यांचे वेतन, विमा, अपघात विमा, नकुसार भरपाई ही सर्व जवबादारी ही संबंधीत संस्थाची राहील.यास जिल्हा परिषद जवाबदार राहणार नाही.

२३.संस्थे संदर्भात काही कायदेशीर प्रकरण उदभवल्यास वा काही अनुचीत प्रकार उघड झाल्यास संस्थे सोबतचा करार संपुष्टात आणण्यात येईल.

२४.संस्थेच्या कार्यमुल्यमापन सक्षम प्राधिकरण यांनी केल्या नंतरच समाधानकारक असल्यास शुल्क अदा करण्यात येईल.

२५.संस्था दिवाळखोर Bank Corrupt, वा इतर दस्ताऐवजावरुन आर्थिक क्षमता नसल्याचे लक्षात आल्यास संस्थेची निवड होणार नाही.

२६.व्यावसायिक संस्था/कंपनी यांनी प्रस्ताव सादर करते वेळी उपरोक्त नमुद सर्व प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य राहील.

२७.व्यावसायिक संस्था/कंपनी यांची निवड करण्यात आल्यास त्यांना शासकीय दरानुसार मुद्रांकावर विहित नमुन्यात निश्चित अटी व शर्ती नुसार संबंधीत प्राधिकरणा सोबत करार करणे बंधनकारक राहील. व त्या करारनुसार संस्थेस काम करणे बंधनकारक राहील.

२८.व्यावसायिक संस्था/कंपनी यांना सक्षम प्राधिकरणा मार्फत कार्यादेश प्राप्त झाल्यांनंतर निश्चीत करुन देण्यात आलेल्या मुदतीत सर्वेक्षण करणे, आराखडे तयार करणे (DPR) तयार करणे, अंदाज पत्रक सादर करणे ही जवाबदारी संस्थेची राहील.

२९.प्रकल्पात निवडण्यात आलेल्या गावांची संख्या शासनाचे निर्देश व निधीच्या उपलब्धते नुसार कमी जास्त करण्यात येईल.याबाबत संस्थेस कोणताही आक्षेप घेता येणार नाही.

३०.व्यावसायिक संस्था/कंपनी यांचे कामाचे सनियंत्रन व मुल्यांकन कार्यकारी अभियंता ग्रापापु जि.प. नागपूर यांचे मार्फत ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग हे करतील. तर व्यावसायिक संस्था यांचे कामाचे जिल्हा स्तरीय सनियंत्रण व मुल्यांकन व मार्गदर्शन स्वच्छता तज्ञ जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष यांचे व्दारे करण्यात येईल.

३१.स्वारस्य अभिव्यक्ती संबंधी प्रक्रिया कुठल्याही स्तरावर थांबविण्याची , रदद करण्याचे संपूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडे राखीव राहतील.

३२. संस्थानी आरखडा तयार करीत असतांना वा प्रत्यक्ष कामाची अंमलबजावनी करतांना पर्यावरणीय , पाणी गुणवत्ता व भुजलविषयक नियमांचे पालन करणे अनिवार्य राहील.

३३.संस्था/कंपनीचे काम, सेवा समाधानकारक नसल्यास त्यांच कामाबाबत ग्राम पंचायत मार्फत तक्रार प्राप्त झाल्यास अथवा ग्राम पंचायत व संस्था यांचे दरम्यान कुठल्याही विषयावर वाद उत्पन्न झाल्यास यासंदर्भात अंतिम निर्णय देण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचा राहील.

३४.पाणी पुरवठा व स्वछता विभाग यांचे विषयासंबधीत सर्व शासन निर्णयामधील तरतुदीनुसार जिल्हा परिषदेची कार्यप्रणाली असेल.करीता शासन व शासनामार्फत वळोवेळी प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शक सुचना व आदेशाप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करण्याकरीता गरजेनुसार आवश्यक सुचना संस्थेस दिल्या जातील व त्यांचे पालन करणे संसथेस बंधनकारक असेल. याबाबत कार्यपध्दतीत कोणाताही तांत्रिक/ प्रशासकीय बदल झाल्यास संस्थेस तक्रार करता येणार नाही.

३५.स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) प्रकीये दरम्यान व कार्यादश निर्गमित करण्यात आल्यानंर कुठलाही टप्पावर सदर प्रकीया व कार्यादेश रदद करणे स्थगीत करणे याचे संपूर्ण अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नागपूर यांचे कडे राखील राहील.

**प्रकल्प संचालक (पाणी व स्वच्छता)**
**जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष**
**जि.प.नागपूर**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नागपूर**